विविध कल्याणकारी योजनांमध्ये वस्तुस्वरूपात मिळणाऱ्या लाभाचे हस्तांतर, रोख स्वरूपात थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात (DBT) जमा करणेबाबतच्या प्रक्रियेतून “गणवेश” ही बाब शालेय विद्यार्थ्यांच्या बाबतीत वगळणेबाबत

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग
शासन निर्णय क्रमांक : डिसीटी-२३१८/प्र.क्र.७२/का.१४१७
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : ४ जून, २०१९

पहा: १) नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक : डिसीटी-२३१६/प्र.क्र.१३३/का.१४१७, दिनांक ५ डिसेंबर, २०१६
२) नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक : डिसीटी-२३१८/प्र.क्र.२९/का-१४१७, दिनांक १२ एप्रिल, २०१८
३) नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक : डिसीटी-२३१८/प्र.क्र.१०१/का.१४१७, दिनांक ४ जुलै, २०१८

प्रस्तावना :

नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक : डिसीटी-२३१६/प्र.क्र.१३३/का.१४१७, दिनांक ५ डिसेंबर, २०१६ अन्वये शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांमध्ये ज्या ठिकाणी शासनाद्वारे वस्तू स्वरुपात अनुदान देण्यात येत आहे, त्या ठिकाणी वस्तू स्वरुपात अनुदान देण्याऐवजी रोख स्वरुपात थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात (DBT) जमा करण्याबाबत निर्णय घेण्यात आला होता. सदर शासन निर्णयातील “परिशिष्ट-अ” मध्ये “अ.क्र.८” येथे “गणवेश” ही वस्तू दर्शविण्यात आली आहे.

२. केंद्र पुरस्कृत सर्व शिक्षा अभियानाअंतर्गत मोफत गणवेश योजनेअंतर्गत पात्र शालेय विद्यार्थ्यांना “गणवेश” संच उपलब्ध करुन देण्यासाठी प्रति विद्यार्थी करिता रु.४०० ची तरतूद शालेय शिक्षण व क्रिडा विभागामार्फत करण्यात येते. सर्व शिक्षा अभियानाअंतर्गत मोफत “गणवेश” संच करिता रु.४०० रोख स्वरुपात थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात (DBT) जमा होण्यासाठी शालेय विद्यार्थ्यांचे “शून्य शिल्लकीवर बँक बचत खाते (Zero Balance Savings Bank Account)” उघडून वर्षभर सुरु ठेवण्यास अडचणी उपस्थित होत आहेत. बँक कडून होणाऱ्या व्यवहारासाठी “SMS शुल्क / GST शुल्क” तसेच “किमान रक्कम शुल्क (Minimum Balance Charges)” अशी विविध प्रकारच्या नियमनांचे पालन करणे बँकांकडून बंधनकारक करण्यात येत असल्याने शालेय विद्यार्थ्यांना मोफत “गणवेश” संच वेळेवर मिळत नाही. सबब, व्यापक लोकहिताच्या दृष्टीने वस्तुस्वरूपात मिळणाऱ्या लाभाचे हस्तांतर, रोख स्वरूपात थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात (DBT) करणेबाबतच्या प्रक्रियेतून सर्व शिक्षा

अभियानाअंतर्गत शालेय शिक्षण व क्रिडा विभागामार्फत सर्व शिक्षा अभियानाअंतर्गत शालेय विद्यार्थ्यांना पुरविला जाणारा “गणवेश” संच ही वस्तू कायमस्वरुपी वगळण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

केंद्र पुरस्कृत सर्व शिक्षा अभियानाअंतर्गत शालेय शिक्षण व क्रिडा विभागामार्फत शालेय विद्यार्थ्यांना पुरविला जाणारा “गणवेश” संच थेट लाभ हस्तांतरण (DBT) प्रक्रियेमधून वगळण्याबाबतच्या प्रस्तावास नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक : डिसीटी-२३१८/ प्र.क्र.२९/का-१४१७, दिनांक १२ एप्रिल, २०१८ अन्वये गठीत छाननी समितीने केलेल्या शिफारशी शासनाने मान्य केल्यामुळे नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक : डिसीटी-२३१६/प्र.क्र.१३३/का.१४१७, दिनांक ५ डिसेंबर, २०१६, “परिशिष्ट-अ” मधील “अ.क्र.८” येथे दर्शविण्यात आलेली “गणवेश” ही वस्तू शालेय विद्यार्थ्यांच्या बाबतीत कायमस्वरुपी वगळण्यात येत आहे.

२. महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर सदर शासन निर्णय उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१९०६०४११३८३७१११६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

HEMANT DATTA BHANGLE

Digitally signed by HEMANT DATTA BHANGLE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=31cc357a98de35264e3f32a02a11a5f444ac03f702947b9db1e018f1ec6ec357, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=3e3482a3b78b132fd024af2073b3b3aa28fe67898c829b2dc628c953bb336e14, ou=PLANNING DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=HEMANT DATTA BHANGLE
Date: 2019.06.04 11:42:56 +05'30'

(हेमंत भांगले)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, यांचे सचिव.
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव.
३. मा.सर्व मंत्री यांचे खाजगी सचिव.
४. मा.विरोधी पक्षनेता (विधानसभा / विधानपरिषद) यांचे खाजगी सचिव.
५. मा.सर्व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
६. मा. विधानसभा / विधानपरिषद सदस्य (सर्व).
७. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, (महाराष्ट्र-१/२), मुंबई / नागपूर.
८. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
९. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव सर्व मंत्रालयीन विभाग.
१०. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (पत्राने).

११. महासंचालक, युआयडी प्रादेशिक कार्यालय, सातवा मजला, एमटीएनएल बिल्डिंग, जी.डी.सोमानी मार्ग, कफ परेड, मुंबई-४००००५.

१२. महाव्यवस्थापक, राज्य स्तरीय बँकर्स समिती, बँक ऑफ महाराष्ट्र, केंद्रीय कार्यालय, लोकमंगल, १५०१, शिवाजीनगर, पुणे ०५.

१३. विभागीय आयुक्त, सर्व.

१४. जिल्हाधिकारी, सर्व

१५. व्यवस्थापक, जिल्हा अग्रणी बँक (सर्व)

१६. जिल्हा माहिती अधिकारी (सर्व)

१७. सह सचिव / उप सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई -३२

१८. निवडनस्ती, कार्यासन १४१७.